**प्रेस नोट** **दिनांक २९/०७/२०२६**

पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ ०२, मुंबई.
डॉ दा. भ मार्ग पोलीस ठाणे, मुंबई

# ''बनावट APK फाईल्स व्दारे आंतरराज्यीय सायबर गुन्हे करणाऱ्या आरोपीतास अटक केलेबाबत''

डॉ.दा.भ मार्ग पोलीस ठाणे मुंबई येथे तक्रारदार यांना महानगर गॅस लिमीटेडच्या नावाने बनावट संदेश पाठवुन महानगर गॅसची बनावट APK फाईल इन्स्टॉल करण्यास भाग पाडून सदर APK फाईलव्दारे मोबाईलमधील बॅकींगची गोपनीय माहिती चोरुन रूपये ७०,५००/-इतक्या रक्कमेची आर्थिक फसवणुक करण्यात आल्याने गु.र. क्र. १००३/२०२६ कलम ३१८ (४), ३१९ (२) भा. न्या.सं. सह ६६ (क), ६६(ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान सखोल तांत्रिक तपास करून आरोपीताचा मागोवा घेण्यात आला व बनावट APK फाईल डेव्हलप करणाऱ्या खालील आरोपीताचा झारखंड व पश्चिम बंगाल येथे पाठलाग करून त्यास अटक करण्यात आली.

**आरोपी:** xxxxxxx**, वय: २६ वर्ष , व्यवसाय: - शिक्षण,**
**राहणारा -**xxxxxxxx **राज्य- झारखंड**

गुन्हयामध्ये अटक आरोपीकडून १० मोबाईल फोन, ०१ लॅपटॉप, ०७ सिम कार्ड, ०४ क्रेडीट/डेबीट कार्ड, ९६७ APK फाईल आणि ३७२०० व्यक्तींची बॅकिंग संदर्भातील गोपनीय माहितीचा डेटाबेस इत्यादी जप्त करण्यात आले आहेत. गुन्हयातील अटक आरोपीने बनवलेल्या ९१ APK फाईल इतर आरोपींना विक्री केली असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. सदर ९१ APK फाईल द्वारे **भारतातील एकुण २९९३ (त्यातील मुंबईसह महाराष्ट्रातील एकुण ५१२) सामान्य जनतेची सायबर फसवणुक होउन फसवणूकीची एकूण रक्कम रूपये ६३,६९,६८,१७४/-(रुपये त्रेसष्ठ कोटी एकोणसत्तर लाख अड्सष्ठ हजार एकशे चौऱ्याहत्तर) एवढी असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.**

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त, श्री.देवेन भारती, मा.पोलीस सह आयुक्त श्री. मनोजकुमार शर्मा (कायदा व सुव्यवस्था), मा.अप्पर पोलीस आयुक्त श्री.शैलेश बलकवडे (दक्षिण प्रादेशिक विभाग), मा. पोलीस उप आयुक्त श्रीमती रागसुधा आर. (दक्षिण परिमंडळ ०२), मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर वाघ(गिरगाव विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.नितीन दळवी, पोलीस निरीक्षक युवराज पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनवेश पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत देशमुख, पोलीस उप निरीक्षक किरण देवरे, पो.ह. आनंद गावडे, पो.शि दादासाहेब घोडके, पो.शि.आतिष वाघमारे, पो.शि. जगदेव यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याकरता गतीमान कारवाई करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे.